दिनांक १३/०१/२०२०

# सापळा केस

**आलोसे अनिल सखारामपंत खळीकर, , तलाठी सज्जा ताडकळस ता.पुर्णा जि.परभणी (वर्ग–३), यांनी ७,५००/– रू लाच मागणी केल्याचे यशस्वी लाच मागणी कारवाई**

यातील तक्रारदार यांनी अे.सी.बी.परभणी येथे दि. ०९.०१.२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेतीचे नावाचे फेर लावून देण्यासाठी ७,०००/– रूपये लाचेची मागणी केली आहे. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक ०९.०१.२०२० रोजी तक्रारदार यांना त्यांचे शेतीचे नावाचे फेर लावून देण्यासाठी ७,५००/– रूपये लाचेची मागणी करू तक्रारदार त्यांना त्याच दिवशी ठरलेल्या रक्कमे पैकी थोडे देतो असे म्हटले असता तलाठी खळीकर यांनी नमुद रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले. परंतू नमुद आलोसे यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी सदरची लाचेची रक्कम स्विकारली नाही व ते आता तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारणार नाहीत असे तक्रारदार यांनी सांगीतले आहे. म्हणून यांचे विरूध्द पो.स्टे. ताडकळस गु.र.नं. ०८/२०२० कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ ( संशोधन २०१८) अन्वये दाखल करण्यात ला आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोह/शेख शकील, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोशि/धबडगे, पोशि/चट्टे, पोह/हनुमंते, पोह/जहागीरदार, पोना/शेख मुखीद, पोशि/शेख मुक्तार, मपोशि/टेहरे, चापोह/चौधरी, चापोना/कदम अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहितीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५

श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ९६६५४७९३३३

श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी – ७०२१००२११०

श्री.अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी – ८०८७०७२९१९

Scanned by CamScanner